**प्रसिध्दी पत्रक** दिनांक. ०४/०८/२०२३

आरोपी लोकसेवक पठाण शेरखान नुरखान वय ५३ वर्षे पद कर निरीक्षक, नेमणुक कार्यालय प्रभाग समिती 'क', परभणी शहर महानगरपालिका परभणी यांनी तक्रारदार यांचे आईने परभणी शहर महानगरपालिका हद्दीत खरेदी केलेली स्थावर मालमत्ता हि तक्रारदाराचे आईच्या नावावर करण्याचे हस्तांतरणाचे काम करून देण्यासाठी ४,५००/- लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी यांचे जाळयात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | पठाण शेरखान नुरखान वय ५३ वर्षे पद कर निरीक्षक, नेमणुक कार्यालय प्रभाग समिती 'क', परभणी शहर महानगरपालिका परभणी<br>विभाग नगरविकास विभाग (वर्ग - ३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,५००/- रु |
| लाचेची स्विकारली रक्कम | ४,५००/- रु |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे आईने परभणी शहर महानगरपालिका हद्दीत स्थावर मालमत्ता खरेदी केलेली आहे. सदर स्थावर मालमत्तेचे त्यांचे आईचे नावावर हस्तांतरणाचे काम करून देण्यासाठी आलोसे हे तक्रारदार यांना एकुण ११,०००/- रूपयांची मागणी करीत होते. त्यात ६,५००/- रु शासकिय फिस असेल व उर्वरित रक्कम ४,५००/- रु हे टेबलावर द्यावे लागतात असे सांगुन लाच मागणी करित असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>आज रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांना ११,०००/- रु ची मागणी केली. त्यातील ६,५००/- शासकिय फि असेल व उर्वरित ४,५००/- रु ही रक्कम सहीसाठी टेबलावर द्यावी लागते असे म्हणुन लाच मागणी केली.<br>सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक शेरखान पठाण यांनी मागणी केलेली फि व लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी तक्रारदार हे पंचासह कार्यालय प्रभाग समिती क, परभणी शहर महानगरपालिका येथे गेले – तिथे आलोसे पठाण यांनी शासकिय फि व लाचेची रक्कम असे एकुण ११,०००/- रु पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन स्विकारले. तक्रारदार यांनी आलोसे यांना शासकिय फिस रक्कम ६,५००/- रूपयाची पावती मागितली असता सदर पावती १० दिवसानंतर मिळते असे सांगितले. आलोसे पठाण यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस स्टेशन नवामोंढा येथे सुरु आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही मा.डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली सापळा कार्यवाही श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक,एसीबी,परभणी तसेच सापळा कार्यवाही पथक पोह/मिलींद हनुमंते, रविंद्र भूमकर, सिमा चाटे, अनिरूध्द कुलकर्णी पोशि/अतुल कदम, मो.जिब्राईल, शेख मुक्तार व चापोह/जे.जे.कदम ॲन्टी करप्शन ब्युरो परभणी. |
| तपास अधिकारी | श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,परभणी |

ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास अगर भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो परभणी येथे संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- ॲन्टी करप्शन ब्युरो, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
|---|---|
| ☎ 02452-220597 टोल फ्री :- 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharastra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Instagram : acbparbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |

(अशोक इप्पर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी.